



# पारनेर दर्शन






वर्ष ३ अंक ३५, मंगळवार २४ डिसेंबर २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

## बनावट सोने ठेऊन ४७ लाखांची फसवणूक

### गोरेश्वर पतसंस्थेतील प्रकार | ११ जणांविरोधात गुन्हा | पारनेर शहरात खळबळ

**पारनेर : प्रतिनिधी**

**१० कर्जदार व गोल्ड व्हॅल्युअर यांनी संगनमत करून बनावट सोने खरे असल्याचे भासवून गोरेश्वर पतसंस्थेची ४६ लाख ९१ हजार रूपयांची फसवणूक केल्याप्रकरणी गोल्ड व्हॅल्युरअरसह दहा खातेदारांविरोधात पारनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, याप्रकरणी एका आरोपीस पोलीसांनी अटक केली आहे.**

यासंदर्भात पारनेर पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार गोरेश्वर ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेच्या गोरेगांव शाखेतून १२ जुन २०२० ते ३१ मार्च २०२१ या कालावधीमध्ये दहा कर्जदारांनी बनावट सोने तारण ठेऊन कर्ज घेतले होते. कर्ज घेतल्यानंतर त्यांनी एक रूपयाही न भरता सर्व खाती थकबाकीमध्ये गेले होते. पतसंस्थेच्या वतीने कर्जदारांना वारंवार नोटीस पाठवूनही त्याची दखल घेतली जात नव्हती. गोल्ड व्हॅल्युअर शैलेश डहाळे याने बँक ऑफ महाराष्ट्रच्या पारनेर शाखेतही अशाच प्रकारे बनावट सोने खरे असल्याचे भासवून कर्ज देण्याची शिफारस केली होती. बँकेकडून कर्जदार व गोल्ड व्हॅल्युअर यांच्यावर गुन्हा दाखल केल्यानंतर गोरेश्वर पतसंस्था प्रशासनास शंका आल्याने त्यांच्याकडे ठेवण्यात आलेल्या सोन्याची पडताळणी करण्याचा प्रयत्न केला गेला असता व्हॅल्युअर व खातेदार यांनी टाळाटाळ करण्यास सुरूवात केली होती.

वारंवार नोटीस पाठवूनही दखल न घेतल्याने अखेर संस्थेच्या वतीने व्हॅल्युअर व कर्जदारांविरोधात फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्यात आला. शाखा व्यवस्थापक जालिंदर जनाजी नरसाळे रा. गोरेगांव, ता. पारनेर यांनी यासंदर्भात फिर्याद दिली आहे.




#### हे आहेत आरोपी

आशा बाळासाहेब कोल्हे रा. नागेश्वर मंदिराजवळ, पारनेर, भारती अनिल दैवज्ञ रा. नागेश्वर मंदिराजवळ, पारनेर,राहुल बाळासाहेब कावरे रा. सिध्देश्वरवाडी, ता. पारनेर, बाळासाहेब संपत कोल्हे रा. नागेश्वर मंदिराजवळ, पारनेर, अंबादास दिलीपराव औटी रा. लोणी रोड, पारनेर, पोपट इंद्रभान सोंडकर रा. लोणीहवेली, ता. पारनेर, राजेंद्र अर्जुन काणे, रा. चिंचोली रोड, पारनेर, शंकर पोपट औटी रा. जुनी पेठ, पारनेर, दिलीप निवृत्ती खोसे, रा. सरकारी दवाखान्याजवळ, पारनेर सुजाता शैलेंद्र डहाळे रा. आभुषण ज्वेलर्स, शिवाजी रोड, पारनेर, गोल्ड व्हॅल्युअर शैलेंद्र चंद्रकांत डहाळे रा. पारनेर.

#### काय आहे फिर्याद ?

गोल्ड व्हॅल्युअर व कर्जदार यांनी आपसांत संगनमत करून पतसंस्थेचे नुकसान व स्वतःचा फायदा करून घेण्याच्या उद्देशाने पतसंस्थेत सोने तारण कर्जाकरीता येणारे सोने खरे आहे का कसे ? याची वजन व शुध्दता तपासण्याकरीता लेखी पत्राद्वारे गोल्ड व्हॅल्युअर म्हणून नेमणूक केलेल्या शैलेंद्र चंद्रकांत डहाळे याने १० कर्जदारांनी आणलेले सोने देऊन ते खरे असल्याचे बनावट प्रमाणपत्र तयार केले.

#### एकही हप्ता भरला नाही !

फसणूकीच्या उद्देशाने बनावट सोने खरे म्हणून पतसंस्थेत दाखल करून त्या मोबदल्यात १० जणांच्या नावावर वेगवेगळया रकमेचे कर्ज उचण्यात आले. मुळातच सर्व आरोपींना त्यांचे सोने बनावट असल्याची माहीत असल्यामुळे या कर्जाचा एकही हप्ता न भरता, त्यांच्या स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी पतसंस्थेचा विश्वासघात करून ४६ लाख ९१ हजार रूपयांची फसवणूक केल्याचे फिर्यादीमध्ये नमुद करण्यात आले आहे.

#### विविध कलमांन्वये गुन्हा

भारतीय दंड विधान कलम ४२० ,४०६ ,४०९,४६५ ,४६७ ,४६८,४७१ ,३४ प्रमाणे सर्व आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.११ आरोपींविरोधात गुन्हा दाखल झाल्याने पारनेर शहरात एकच खळबळ उडाली आहे.

#### बाळासाहेब कोल्हे यास अटक

या गुन्हयातील आरोपी व मास्टरमाईंड बाळासाहेब संपत कोल्हे रा. नागेश्वर मंदिराजवळ यास पोलीसांनी पहाटे त्याच्या घरातून अटक केली. गुन्हा दाखल झाल्यानंतर इतर आरोपी पसार झाले असून पोलीस त्यांच्या मागावर आहेत.

#### काही जात्यात, काही सुपात !

तालुक्यातील गोरेश्वर पतसंस्थेसह राजे शिवाजी, सेनापती बापट या पतसंस्थेमध्ये ठेवी अडकल्याने तालुक्यातील ठेवीदारांमध्ये प्रचंड संतापाचे वातावरण आहे. सोमवार पासून जिल्हा उपनिबंधक कार्यालयासमोर ठेवीदारांचे उपोषणही सुरू आहे. गोरेश्वर पतसंस्थेचा बनावट सोने घोटाळा बाहेर आल्यानंतर इतर काही संस्था चालकांचेही धाबे दणाणले आहे. गोरेश्वर पतसंस्थेचा गुन्हा दाखल झाला असला तरी काही जात्यात आणि काही सुपात आहेत !

## स्व. विखे यांचे स्वप्न पुर्ण करण्याची संधी

### ■ कोकणात वाहून जाणारे पाणी गोदावरी खोऱ्यात वळविणार ■ मंत्री राधाकृष्ण विखे यांचा सुपे येथे सत्कार



■ जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे यांचा लाडकी बहिण योजनेचे तालुकाध्यक्ष सुनील थोरात यांच्या संपर्क कार्यालयात सत्कार करण्यात आला.

**सुपा : प्रतिनिधी**

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जलसंपदा विभागाच्या अतिशय महत्वाच्या खात्याची जबाबदारी माझ्यावर सोपविली असून त्यात मी समाधानी आहे. या मंत्रीपदाच्या माध्यमातून स्व. बाळासाहेब विखे यांनी कोकणात वाहून जाणारे पाणी गोदावरी खोऱ्यात आणण्याचे स्वप्न पुर्ण करण्याची संधी मिळाली असून आगामी काळात हे पाणी आपण गोदावरी खोऱ्यात वळविण्याचे काम हाती घेणार असल्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे यांनी सांगितले.**

मंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर पुण्याहून प्रथमच नगरकडे जाताना मंत्री विखे यांनी लाडकी बहिण योजनेचे तालुकाध्यक्ष सुनील थोरात यांच्या संपर्क कार्यालयास भेट दिली. त्यावेळी त्यांचा सत्कार करण्यात आला. सत्कारानंतर त्यांनी महायुतीच्या कार्यकर्त्यांशी संवाद साधला.

मंत्री विखे म्हणाले, राज्य मंत्रीमंडळात जलसंपदा विभागाची मिळालेली जबाबदारी म्हणजे काम करण्याची संधी असून पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोपविलेल्या जबाबदारीतून स्व. बाळासाहेब विखे यांचे स्वप्न पुर्ण करण्याचे दायित्व मुख्यमंत्र्यांनी माझ्यावर सोपविले आहे. ही जबाबदारी यशस्वी करण्यासाठी माझा प्रयत्न असेल.

विखे पुढे म्हणाले, कोकणात वाहून जाणारे पाणी गोदावरीच्या तुटीच्या खोऱ्यात वळविण्यासाठी स्व. बाळासाहेब विखे यांनी महाराष्ट्र पाणी परिषदेच्या माध्यमातून केंद्र आणि राज्य सरकारला मसुदा सादर केला होता. त्याचेच आता धोरणात रूपांतर झाले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही यासाठी पुढाकार घेतल्याने गोदावरीच्या तुटीच्या खोऱ्यात पाणी वळविण्याचे ऐतिहासिक काम भविष्यात पुर्ण करण्यासाठी माझी वाटचाल असेल. कृष्णा खोऱ्यातील पाणी प्रश्नाबाबतही निश्चित असे धोरण घ्यावे लागेल. बिगर सिंचनाचे वाढते प्रमाण शेतीच्या पाण्याचे निर्माण होणारे प्रश्न, पाण्याची उधळपट्टी थांबविणे, आणि पाणी सोडण्याच्या वितरण व्यवस्थेत चांगली सुधारणा करणे यासाठी काम करावे लागणार असल्याचे मंत्री विखे म्हणाले.

यावेळी भाजपाचे तालुकाध्यक्ष राहुल शिंदे, लाडकी बहिण योजनेचे तालुकाध्यक्ष सुनील थोरात, लहू भालेकर, दत्ता पवार, मनोज मुंगसे, अमोल मैड, दिनेश बाबर, शंकर नगरे, युवराज पठारे, मधुकर पठारे, तुषार पवार, वसंत मगर, संपत मगर, सुनील पवार, भरत गट, सचिन शेळके, गणेश पठारे, तारा दरेकर, अक्षय दळवी यांच्यासह महायुतीचे असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

#### पारनेरच्या पाण्यासाठी पुढाकार

घाटमाथ्यावर पडणारे कोकणात वाहून जाणारे पावसाचे पाणी वळवून ते पश्चिमेकडे आणण्याचे स्व. बाळासाहेब विखे यांचे स्वप्न होते. पारनेर तालुक्याच्या दुष्काळी भागाला या पाण्यामुळे संजिवनी देण्याचा स्व. विखे यांचा प्रामाणिक प्रयत्न होता. त्यांचे हे स्वप्न पुर्ण करण्याची संधी मिळाली असून पारनेर तालुक्याचे हक्काचे दोन टीएमसी पाणी मिळवून देण्यासाठी आपण काम सुरू करणार आहोत. तालुक्याच्या इतर पाणी योजनांसाठीही आपण पुढाकार घेऊ.

राधाकृष्ण विखे
जलसंपदा मंत्री

#### उद्योजक, अधिकाऱ्यांची बैठक

सुपा-पारनेर एमआयडीसीमध्ये अनेक परदेशी उद्योग आले आहे. आणखीही अनेक परदेशी उद्योग येण्यास उत्सुक आहेत. या पार्श्वभुमीवर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे अधिकारी तसेच उद्योजकांची लवकरच बैठक घेण्यात येऊन सुपा एमआयडीसीला अधिकची चालना देण्यात येणार असल्याचे विखे म्हणाले.


#### साकळाईसाठीही प्रयत्न

श्रीगोंदे व नगर तालुक्याला वरदान ठरणाऱ्या साकळाई योजनेसाठीही आपण प्रयत्न करणार आहोत. गोदावरी खोऱ्यामध्ये पाणी वळविल्यानंतर हे काम सहज मार्गी लागू शकेल असा विश्वास मंत्री विखे यांनी व्यक्त केला.

## पुण्यात डंपरने नऊ जणांना चिरडलं; दोन बालकांसह तिघांचा जागीच मृत्यू

**पुणे :प्रतिनिधी**

**पुण्यात वाघोलीच्या केसनंद परिसरात एक अतिशय भीषण अपघात झाला. या अपघातात डंपरने तब्बल नऊ जणांना चिरडले. पोटाची खळगी भरण्यासाठी हे मजूर अमरावतीहून पुण्यात दाखल झाले होते. मात्र, पुण्यात यायला उशीर झाल्याने सर्वजण फूटपाथवर झोपले. मध्यरात्री एक वाजण्याच्या सुमारास डंपर चालकाने नऊ जणांना चिरडले. हा डंपर चालक दारूच्या नशेत असल्याचे सांगितले जाते. या अपघातात दोन बालकांसह तिघांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेने मोठी हळहळ व्यक्त केली जाते.**



या घटनेनंतर मोठे पडसाद उमटताना दिसत आहेत. या घटनेबद्दल बोलताना शिरूरचे आमदार माऊली कटके यांनी म्हटले की, मुळात म्हणजे ही घटना अतिशय दुर्दैवी आहे. रांजणगावात अनेक कंपन्या असल्याने तिथे कामगार मोठ्या प्रमाणात येतात. वाघोली परिसरात वाहतूक कोंडीची मोठी समस्या आहे. रस्त्याची सुधारणा व्हायला पाहिजे. याबद्दल मी विधानसभेत प्रश्न मांडणार असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

या अपघातातील डंपर चालकाचे नाव गजानन शंकर तोट्रे, (२६ वर्षे) राहणार नांदेड आहे. तो गेल्या अनेक वर्षांपासून जड वाहने चालवतो. दारूच्या नशेत तो डंपर चालवत असल्याचा आरोप आहे. तो खरोखरच दारू पिऊन डंपर चालवत होता की नाही याबद्दल खुलासा मेडिकल टेस्टच्या रिपोर्टनंतर होईल, असे पोलिसांनी सांगितले आहे. घटनास्थळावरून डम्पर चालकाला पोलिसांनी उर्वरीत पान ३ वर

## राज्यातून गुलाबी थंडी गायब

### पुढील दोन दिवसात पावसाची शक्यता

**पुणे : प्रतिनिधी**



**सध्या हिवाळा सुरु असला तरी राज्यातून गेल्या काही दिवसांपासून थंडी गायब झाल्याचे पाहायला मिळाले आहे. आता अरबी समुद्रात तयार होत असलेल्या चक्राकार वाऱ्यांमुळे आर्द्रता वाढली आहे. परिणामी, राज्यात येत्या काही दिवसात किमान तापमान हळूहळू २-३ अंशांनी वाढणार आहे. इशान्येकडील राज्यांमध्ये पावसाला पोषक वातावरण तयार झाले आहे. याचाच परिणाम महाराष्ट्राच्या तापमानावर होणार असून पुढील दोन दिवसात राज्यात काही भागात पावसाची शक्यता आहे.**

राज्यात थंडीचा जोर कमी झाला असून तापमान वाढलं आहे. मध्य महाराष्ट्रात किमान तापमानात वाढ झाली असून पुण्यात १७ ते २० अंश सेल्सियसची नोंद करण्यात आली आहे. नाशिकमध्ये १६.४, कोल्हापूर १७.७ अंशांची नोंद झाली. नगरमध्ये १८,सोलापूरात २२ अंश एवढं तापमान होतं. मराठवाड्यात बीड, लातूरमध्ये २० अंश सेल्सियसची नोंद झाली. छत्रपती संभाजीनगरमध्ये १८.७ अंश सेल्सिअस तापमान नोंदवलं गेलं. हिंगोलीत गारठा वाढलेला होता. तिथे १६.५ अंश सेल्सियस तापमान होतं. हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार, उत्तरेकडील राज्यांमध्ये म्हणजे जम्मू काश्मीर, हिमाचल प्रदेश, पंजाब, राजस्थानमध्ये थंडीची लाट कायम आहे. उर्वरीत पान ३ वर

## नववर्षाच्या स्वागतासाठी साईमंदिर रात्रभर खुले राहणार

### ३१ डिसेंबरला शिर्डी महोत्सवाचे आयोजन

**शिर्डी : प्रतिनिधी**



**शिर्डी श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डीच्या वतीने नाताळ सुट्टी, चालू वर्षाला निरोप व नवीन वर्षाचे स्वागतानिमित्त शिर्डी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. श्री साईबाबांच्या दर्शनासाठी शिर्डीत होणारी संभाव्य गर्दी लक्षात घेऊन समाधी मंदिर मंगळवारी, ३१ डिसेंबर २०२४ रोजी दर्शनासाठी रात्रभर खुले ठेवण्यात येणार असल्याची माहिती संस्थानचे प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब कोळेकर यांनी दिली.**

कोळेकर म्हणाले, दरवर्षी नाताळ सुट्टी, चालू वर्षाला निरोप व नवीन वर्षाच्या स्वागतानिमित्त श्रींच्या दर्शनासाठी शिर्डीत मोठ्या प्रमाणात भाविक येतात. येणाऱ्या सर्व भाविकांना श्रींच्या समाधीच्या दर्शनाचा लाभ मिळावा व होणाऱ्या गर्दीचे नियोजन योग्य रितीने व्हावे, या उद्देशाने ३१ डिसेंबर २०२४ रोजी श्रींचे समाधी मंदिर दर्शनासाठी रात्रभर खुले ठेवण्यात येणार आहे. त्यामुळे ३१ डिसेंबर रोजीची शेजारती व १ जानेवारी २०२५ रोजीची पहाटेची काकड आरती होणार नाही.

नाताळ व नवर्षाच्या सुटीच्या गर्दीमुळे बुधवारी, २५ डिसेंबर ते बुधवार १ जानेवारी २०२५ रोजी असे ७ दिवस वाहन पूजा बंद राहतील. परंतु नाताळ सुटीच्या कालावधीत श्रीसाईसत्यव्रत पूजा, अभिषेक पूजा सुरू राहील, याची सर्व साईभक्तांनी नोंद घ्यावी, असे सांगून मंदिर व परिसरात उर्वरीत पान ३ वर




# युवा

# ब्रेकअपनंतर व्यक्तीत होणारे मोठे बदल!



जसं प्रेमात पडलेल्या माणसात अनेक बदल दिसू लागतात, अगदी तसंच ब्रेकअप झालेल्या व्यक्तीमध्येही मोठ्या प्रमाणात बदल घडून येतो. काही वेळेस हे बदल चांगले व सकारात्मक असतात. काही वेळा हे बदल वाईट आणि नकारात्मकही असतात...

ब्रेकअप अर्थात प्रेमभंग कोणत्याही व्यक्तीच्या आयुष्यातील सर्वात मोठा क्षण असतो. कारण त्या एका घटनेने त्याचे अख्खे आयुष्य बदलून जाते. आपण ज्या व्यक्तीवर जीवापाड प्रेम केलं त्या व्यक्तीचा विरह हा सहन करण्यापलीकडला असतो. ज्याच्या सोबत आयुष्यभर राहण्याची वचने घेतली ती व्यक्ती जेव्हा अर्ध्या आयुष्यातून सोडून जाते तेव्हा होणाऱ्या यातना या असह्य असतात. पण म्हणतात ना माणूस सगळं काही विसरून पुढे निघून जातो. प्रेमभंग झाला म्हणून रडत बसणारी लोकं फार कमी असतात. बहुतांश लोकं काही वेळ त्याचं दुःख गाळतात आणि मग समोर पडलेलं आयुष्य गोड मानून ते जगू लागतात. नव्या जोडीदाराच्या शोधामध्ये, नवीन कोणीतरी येऊन आपल्या आयुष्याला रंग देईल या आशेने! पण तुम्हाला माहीत आहे का ज्या व्यक्तींचं ब्रेकअप होतं त्यांच्यात नक्की बदल काय घडतो? चला आज आपण तेच जाणून घेण्याचा प्रयत्न करुया.



- कमिटमेंटपासून दूर राहणे : ब्रेकअप झालेली व्यक्ती जेव्हा नव्या नात्यामध्ये जाते तेव्हा नव्या जोडीदाराला कमिटमेंट देण्याचे टाळते. अर्थात हे नातं मी खरंच आयुष्यभरासाठी टिकवेन असे वचन ती देत नाही. अर्थात या मागे समोरच्याला फसवण्याचा त्या व्यक्तीचा उद्देश नसतो तर आपली झालेली फसवणूक ती व्यक्ती विसरलेली नसते. म्हणून नवं नातं खरंच कितपत टिकेल का याची त्या व्यक्तीलाच शाश्वती नसते. त्यामुळे हा एक मोठा बदल घडतो की ब्रेकअप झाल्यावर आयुष्यात जे जोडीदार येतात त्यांना कमिटमेंट देण्यास मन धजावत नाही.
- जास्त स्वाभिमान : ज्या व्यक्तीवर आपण खरं प्रेम करतो त्या व्यक्तीसाठी आपण आपला सर्व स्वाभिमान सोडून दिलेला असतो. त्या व्यक्तीसाठी काहीही म्हणजे काहीही करण्याची आपली तयारी असते. पण जेव्हा ती व्यक्ती सोडून जाते तेव्हा आपल्याला आपली चूक कळते की आपण आपला स्वाभिमान प्रेमात सोडून देणे हे चूक आहे. त्यामुळे ब्रेकअप झाल्यावर तो स्वाभिमान पुन्हा जागृत होतो आणि इतर कोणत्याही व्यक्तीसाठी तो पुन्हा सोडून देता येत नाही.
- प्रॅक्टीकल होणं : ब्रेकअप हे माणसाला प्रॅक्टीकल बनवते. आजवर भावनेत अडकून पडलेला व्यक्ती ब्रेकअपमुळे ताळ्यावर येतो आणि त्याला कळते की कोणात जास्त अडकून राहणे हे आपल्यासाठीच धोकादायक आहे. कारण समोरच्या व्यक्तीला त्याचा जास्त त्रास होत नाही. पण आपल्याला खूप




त्रास होतो. ही गोष्ट लक्षात आल्यावर साहजिकच ती व्यक्ती इमोशनलपणा सोडून प्रॅक्टीकलपणावर भर देते आणि शक्य तितकं प्रॅक्टीकल राहण्याचा प्रयत्न करते. आयुष्यात नवीन व्यक्ती आली तरी तिच्यात जास्त अडकून राहत नाही. हा अजून एक मोठा बदल ब्रेकअपनंतर व्यक्तीमध्ये घडतो.
- कुटुंब आणि मित्रमैत्रिणींना जास्त वेळ : माणूस जेव्हा प्रेमात असतो तेव्हा त्याला इतर जगाशी काहीही पडलेली नसते. त्या व्यक्तीसाठी आपला जोडीदारचं सर्वस्व असतो. यामुळे कुटुंबातील रक्ताचे लोक, मित्र मैत्रिणी यांच्याशी संबंध तुटतो आणि त्यांच्याशी असलेले नाते काहीसे दुरावले जाते. प्रेमात असलेल्या माणसाला तुम्ही या गोष्टी कितीही समजावून सांगितल्या तरी तो ऐकणार नाही. पण जेव्हा ब्रेकअप होते आणि मानसिक आधार द्यायला हीच सगळी लोकं मदत करतात तेव्हा त्या व्यक्तीला आपली चूक कळते आणि ती व्यक्ती आपल्या कुटुंबाला आणि मित्र मैत्रिणींना जास्त प्राधान्य देते. त्यांच्या सोबत राहून तिला आनंद सुद्धा मिळतो.
- करिअरवर फोकस : ब्रेकअपनंतरचा सर्वात महत्त्वाचा बदल म्हणजे ती व्यक्ती करिअरवर फोकस करू लागते. प्रेमाच्या नादात आपलं आपल्या करिअरकडे झालेलं दुर्लक्ष पाहून त्या व्यक्तीला पश्चाताप होतो आणि प्रेम वगैरे सगळं खोटं असतं हा समज मनात घेऊन ती व्यक्ती आपल्या करिअरवर लक्ष केंद्रित करते. या दरम्यान ती व्यक्ती नवीन व्यक्तींना सुद्धा आपल्या आयुष्यात येऊ देत नाही.

## म्हणून अरेंज्ड मॅरेजपेक्षा प्रेमविवाहावर जास्त विश्वास!

**गेल्या काही वर्षांमध्ये लव्ह मॅरेजचे प्रमाण वाढत चालले आहे आणि अरेंज्ड मॅरेज करणाऱ्यांचे प्रमाण कमी होत चालले आहे. एक काळ असा होता जेव्हा आई-वडिलांनी पाहिलेल्या स्थळालाच होकार देऊन लग्न करावं लागायचं. आई- वडिलांच्या धाकामुळे नकार द्यायचा प्रश्नच उद्भवत नव्हता. पण जस जसा काळ बदलला तस तशी ही प्रथा मागे पडत गेली आणि आई-वडिलांच्या सहमतीने लव्ह मॅरेज करण्यास सुरुवात झाली. आज असा काळ सुरू आहे ज्यामध्ये बहुतांश मुलं-मुली लव्ह मॅरेजच करतात आणि मग प्रसंगी आई, वडिलांचा नकार पचवण्याची सुद्धा या जोडप्यांची तयारी असते. पण का हा बदल घडला आहे? का आजची तरुण पिढी अरेंज्ड मॅरेजपेक्षा लव्ह मॅरेजवर जास्त विश्वास ठेऊ लागली आहे? का ते लव्ह मॅरेजच्या मागे धावत आहेत? चला आज या मागची कारणे जाणून घेण्याचा आपण प्रयत्न करुया**

- विश्वास : लव्ह मॅरेज मागचे पाहिले कारण हे विश्वास असते. दोन व्यक्तींमध्ये जर विश्वास असेल तर आयुष्यभर एकमेकांना साथ देऊ शकतात. जेव्हा अरेंज्ड मॅरेज केले जाते तेव्हा विश्वासाला जागाच नसते. कारण आपण आयुष्यात पहिल्यांदा ज्या व्यक्तीला भेटतो त्याच्यासोबत थेट आयुष्य काढण्यासाठी मनाची तयारी करावी लागते आणि असे नाते कितपत सुखी राहील याची शाश्वती नसते. पण या ऐवजी लव्ह मॅरेजमध्ये आपण आपल्या जोडीदाराला आधीपासूनच ओळखत असल्याने या व्यक्तीशी आपले पटेल की नाही हे आधीपासूनच आपल्याला माहीत करून घेणे सोपे जाते आणि एक विश्वास तयार होतो की हा व्यक्ती आयुष्यभर आपली साथ देईल.



- पसंत : अरेंज्ड मॅरेजमध्ये व्यक्तीला आपल्या पसंतीची वा आवडीची व्यक्ती सहसा निवडता येत नाही. फार कमी समाज असे आहेत जेथे ज्या व्यक्तीला लग्न करायचे आहे त्याचे मत विचारात घेतले जाते. नाहीतर सहसा आपल्या तोलामोलाचे स्थळ बघून थेट लग्न लावून दिले जाते. ना मुलाला त्याची पसंत विचारली जाते, ना मुलीला! पण लव्ह मॅरेजमध्ये आपल्या आवडीच्या व्यक्ती सोबत आणि आपले ज्याच्यावर प्रेम आहे अशा व्यक्तीचीच निवड करण्याचे स्वातंत्र्य असते आणि एकंदर सुखी संसाराच्या दृष्टीने ही गोष्ट अतिशय महत्त्वाची असते.
- पहिल्या रात्रीची भीती : ही भीती खास करून मुलींना असते. आपण ज्या व्यक्तीला आजवर कधीच भेटलो नाही, ज्याची आणि आपली २ दिवसांचीही धड ओळख नाही तो त्या रात्री आपल्याशी कसा वागेल? आपल्याला समजून घेईल का? आपल्या मनावरचे दडपण समजून घेईल का? असे नानाविध प्रश्न मुलींच्या मनात असते. लव्ह मॅरेजमध्ये आधीच रिलेशनशिपमध्ये असल्याने आपल्या जोडीदाराचा स्वभाव मुलीला माहीत असतो. साहजिकच पहिल्या रात्रीबद्दल अनेक चर्चा झालेल्या असतात. स्वप्ने रंगवलेली असतात. शिवाय लैंगिक संबंधांबाबत त्या मुलाचा दृष्टीकोन समंजसपणाचा आहे हे कळले असल्याने लव्ह मॅरेज बाबत मुली निश्चिंत असतात.
- स्वप्नांना पाठींबा : मुलगा असो वा मुलगी दोघांनाही असा जोडीदार हवा असतो जो त्यांच्या स्वप्नांना समजून घेईल आणि प्रत्येक स्वप्न पूर्ण करण्यासाठी मागे ठामपणे उभा राहील. अरेंज्ड मॅरेजमध्ये आपला जोडीदार आपल्याला समजून घेईलच याची खात्री नसते. त्यामुळे सहसा अरेंज्ड मॅरेजमध्ये थेट संसारालाच लागावे लागते. मात्र लव्ह मॅरेजमध्ये दोघांनाही आपापल्या स्वप्नांची माहिती असते आणि त्यासाठी कोणत्याही खस्ता खाण्याची आणि एकमेकांच्या मागे उभे राहण्याची तयारी असते. आजच्या तरुण पिढीने लव्ह मॅरेजमागे धावण्याचे हे एक मुख्य कारण आहे.
- स्वभाव : हा एक असा घटक आहे जो अरेंज्ड मॅरेजमध्ये ना मुलाला समजून घेता येत ना मुलीला, जर मने आणि स्वभाव जुळलेच नाहीत तर ते नाते किती रटाळ असेल! हेच मत लव्ह मॅरेजला पाठींबा देणाऱ्यांकडून मांडले जाते. त्यांच्या मते ज्या व्यक्तीचा आपल्याला स्वभवाच माहित नाही तर त्यासोबत आयुष्य कसे घालवणार? त्यापेक्षा इतर कोणत्याही व्यक्तीला जाणून घेऊन व त्याचा स्वभाव पाहून मग त्याची जोडीदार म्हणून निवड करणे योग्य आहे.

## हनिमूनला जाताय? या गोष्टी ठेवा लक्षात

**लग्नानंतर आपल्या नव्या आयुष्याची सुरुवात होते. लग्नानंतरचे काही महिने जोडपे एकमेकांचा शोधत असतात. या काळात एकमेकांच्या आवडी- निवडी जाणून घेणं, एकमेकांची मनं जपणं या गोष्टी करत असतात. या सर्वामध्ये महत्त्वाचा क्षण म्हणजे हनिमून, जर या काळात तुम्ही हनिमूनला जाण्याचा विचार करणार असाल तर हा लेख तुमच्यासाठीच आहे. हनिमूनच्या काळात तुम्ही कोणत्या गोष्टी कराव्यात याची माहिती आपण येथे घेणार आहोत...**

आजकाल अनेक कपल एकमेकांसोबत वेळ घालवण्यासाठी हनिमूनचा प्लॅन करताना आपल्याला दिसतात. लग्न आणि त्यानंतरच्या रीतीरिवाजामध्ये कपल थकून जाते. त्यामुळए त्यांच्या एकमेकांसाठी वेळच मिळत नाही. हाच वेळ मिळण्यासाठी लोक हनिमूनचा प्लॅन करतात. पण अति उत्साहामध्ये नकळतपणे अनेक चुका होतात. बरेचवेळा प्रवास अधिक रोमँटिक करण्यासाठी लोक अशा चुका करतात, ज्यामुळे त्यांचा हनिमून खराब होतो. जर या काळात तुम्हीही तुमचा हनिमून प्लान करत असाल तर तुम्ही या गोष्टी लक्षात ठेवा.



- योग्य ठिकाण निवडा : हनिमूनसाठी ठिकाण निवडताना जिथे जास्त गर्दी नसेल किंवा एकमेकांना पूर्ण वेळ देता येईल असे ठिकाण निवडा. यासाठी पीक सीझनला जाणं टाळा. हनिमूनला कुठे जायचे हे निवडताना तुमचे बजेटही लक्षात ठेवा.
- फोटो नकोच : काही लोक लग्नानंतरचे फोटो सोशल मीडियावर शेअर करतात. अशा परिस्थितीत, बहुतेक कपल सोशल प्लॅटफॉर्मवर फोटो आणि स्टेटसमधून क्षणोक्षणी त्यांचे अपडेट्स पोस्ट करत राहतात, परंतु यामुळे आपण निसर्गाचा आनंद घेणे किंवा आपल्या सहलीचा आनंद घेणे विसरतो. त्यामुळे हा वेळ फक्त तुमच्या दोघांसाठीच ठेवा.
- अतिविचार नकोच : जेव्हा एखाद्या गोष्टीचा आपण अती विचार करतो तेव्हा ती गोष्ट ठरल्याप्रमाणे होत नाही असे म्हणतात. त्याचप्रमाणे कोणत्याही गोष्टीबद्दल अती-नियोजन करू नये. हनिमूनच्या काळात फक्त तुमचा आणि तुमच्या जोडीदारासोबत नवीन आठवणी बनवण्यावर भर द्या.
- एकमेकांना संभाळून घ्या : लग्न झाल्यावर तुम्ही पहिल्यांदाच एकत्र प्रवास करता, त्यामुळे या संपूर्ण प्रवासात एकमेकांना संभाळून घ्या. प्रवासात जर तुमच्यापैकी कोणालाही त्रास झाला तर दुसऱ्याने त्याची काळजी घेणं गरजेचं आहे. हे क्षण तुमच्या आयुष्यातील सर्वात महत्त्वाचे आणि खास क्षण असतील.

## साऊथ कोरियातील जोडप्यांची डेटिंग स्टाईल

**प्रेम व्यक्त करण्याची पद्धत हे प्रत्येक व्यक्तीनुसार आणि त्या त्या देशातील संस्कृतीनुसार बदलत जाते. प्रत्येक रिलेशनशीपमध्ये त्यांच्या देशातील कल्चरचा प्रभाव दिसून हा येतोच. यामुळेच डेटिंगपासून लग्नापर्यंतच्या सर्वच गोष्टींमध्ये जसं की चालीरिती, परंपरा, विधी यामध्ये अंतर दिसून येतं. तसं पाहायला गेलं तर दुसरा देश सोडाच कारण एकाच देशातील दोन वेगवेगळ्या घरात लग्नाची पद्धत किंवा डेटिंगची स्टाईल वेगवेगळी असू शकते...**

जसं बाहेरच्या म्हणजेच परदेशातील लोकांना आपल्या संस्कृतीविषयी अधिक माहिती जाणून घेण्याची किंवा ती अनुभवण्याची इच्छा असते अगदी तसंच आपल्याकडील लोकांनाही बाहेरच्या देशातील गोष्टी जाणून घ्यायला गंमत वाटते. आज आम्ही आपल्याला साऊथ कोरियातील तरुण तरुणींना डेटवर घेऊन जाताना कोणकोणत्या युक्त्या वापरतात हे सांगणार आहोत. कदाचित या तरुणांची स्टाईल आपल्या भारतीय तरुण-तरुणींना विचित्र देखील वाटू शकते.



### मॅचिंग आऊटफिट्स

साऊथ कोरियामध्ये कपल्स मॅचिंग आऊटफिट्स घालतात आणि त्यांच्यासाठी ही अगदीच साधारण गोष्ट आहे. खास करून तरुण जोडपी हा ट्रेंड फॉलो करताना दिसून येतात. ही त्यांची खास पद्धत असून यावरून ते इतरांना दाखवतात की आम्ही रिलेशनशीपमध्ये आहोत. त्यांच्याकडे हे इतकं फॉलो केलं जातं की जवळ जवळ प्रत्येक दुकानात कपल्ससाठी मॅचिंग आऊटफिट्स विकायला ठेवले जातात.



### कपल रिंग्स

फक्त मॅचिंग आऊटफिट्सच नाही तर साऊथ कोरियातील जोडपी एकसारखी अंगठी अर्थात रिंग घालून देखील खुलेआम रिलेशनशीप जाहीर करतात. ही कमिटमेंटच्या पुढची पायरी दाखवण्याची एक पद्धत आहे. सोबतच यातून हे देखील समजतं की हा मुलगा किंवा मुलगी माझा प्रियकर किंवा माझी प्रेयसी आहे. या पद्धतीमुळे तिसरा कोणी व्यक्ती नात्याच्या आड येऊन समस्या निर्माण करुच शकत नाही आणि जोडपं आनंदात एकमेकांसोबत नांदू शकतं.

### गप्पागोष्टी

एकीकडे आपल्या देशात पर्सनल स्पेस किंवा स्वतःचा वेळ या गोष्टीला अनेक जोडपी महत्त्व देतात तर साऊथ कोरियामध्ये मात्र २४ तास जोडपी मॅसेजद्वारे एकमेकांशी बोलत असतात किंवा कनेक्ट असतात. गुड मॉर्निंगपासून गुड नाईटपर्यंतच्या मधल्या काळात घडणारी प्रत्येक गोष्ट ते ताबडतोब आपल्या जोडीदारासोबत शेअर करतात. या गोष्टीत जराही हयगय होताना दिसली तर त्यांचं नातं ब्रेकअपपर्यंतही पोहचतं. यावरून समजून येतं की संवाद या गोष्टीला तेथील कपल्स किती गांभिर्याने घेतात.

### ॲनिव्हर्सरी सेलिब्रेशन

नाही, आम्ही इथे आपल्या भारतात करतात तसं एक वर्षानंतर साजऱ्या केल्या जाणाऱ्या ॲनिव्हर्सरी सेलिब्रेशनबद्दल नाही बोलत. तर १०० दिवस, २०० दिवस, ६ महिने अशा ॲनिव्हर्सरी सेलिब्रेशनबद्दल बोलत आहोत. साऊथ कोरियातील कपल्स प्रत्येक महिन्याची ॲनिव्हर्सरी साजरी करण्याबद्दल खूपच हिशोबी असतात आणि हे दिवस खास बनवण्यासाठी ते खूप आधीपासूनच प्लानिंग करायला सुरुवात देखील करतात. म्हणजे कोणत्याच कारणाने आपला जोडीदार आपल्यापासून दूर जाऊ नये व नातं त्याला कंटाळवाणं वाटू नये यासाठी ही जोडपी किती प्रयत्न करतात.

## शॉर्ट न्यूज

### जामखेडमध्ये भीमसैनिकांची निदर्शने

**जामखेड :** केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या वक्तव्याचे पडसाद शहरात उमटले असून भीमसैनिकांनी खर्डा चौकात निदर्शने करीत शाह यांच्या वक्तव्याचा निषेध केला. एक तास चाललेल्या आंदोलनादरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकर झिंदाबाद, संविधान झिंदाबाद, अमित शाह मुर्दाबादच्या घोषणांनी परिसर दणाणून सोडण्यात आला. यावेळी संतप्त भीमसैनिकांनी गृहमंत्री अमित शाह यांनी देशासह दलित समाजाची माफी मागावी, अशा मागणीचे निवेदन तहसीलदार गणेश माळी व पोलिस निरीक्षक महेश पाटील यांना देण्यात आले.

### कार दुचाकीच्या धडकेत महिला ठार

**नेवासा :** तालुक्यातील शिंगवेतुकाई फाटा येथे कारने दुचाकीस धडक दिली. या अपघातात दुचाकीवरील महिला ठार झाली. याबाबत सोनई पोलीस ठाण्यात कारचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अपघातात शेवगाव तालुक्यातील वडुले येथील जया दिनकर काळे या मयत झाल्या. याबाबत रामेश्वर लक्ष्मण भगत रा. ठाकूर निमगाव यांनी फिर्याद दिली असून त्यात म्हटले की, पत्नीची मेव्हणी जया दिनकर काळे या अहिल्यानगर येथील बालसंगोपन विभाग येथील काम आटपून घरी परतत असताना त्यांच्या दुचाकीस पाठीमागून जोरदार धडक दिली. त्यामध्ये जया काळे या ठार झाल्या.

### तिसगावमध्ये पुन्हा चक्री जुगार

**पाथर्डी :** तालुक्यातील एक मोठी व्यापारी बाजारपेठ म्हणून ओळख असलेले तिसगाव हे अवैध व्यवसायांचे केंद्रबिंदू मानले जाऊ लागले आहे. शहरात गेल्या काही दिवसांपासून चक्री जुगाराचा खेळ सुरू आहे. येथे सात ते आठ ठिकाणी चक्री खेळ चालतो. पोलिसांचे याकडे सोईस्कर दुर्लक्ष होत असल्याचा ग्रामस्थांचा आरोप आहे. तिसगाव शहर व परिसरात चोर्‍यांचे प्रमाणही वाढले आहे. वाढत्या चोर्‍या रोखण्यासाठी व चोरट्यांवर कारवाई करण्यास स्थानिक पोलिसांना वेळ नाही.

### गरजूंना अंत्योदय योजनेचा लाभ द्या

**संगमनेर :** शहरातील संजय गांधीनगरमधील रहिवासी सर्वच कुटुंबांचे हातावर पोट आहे. रोजंदारी मिळाली तरच या कुटुंबाचा उदरनिर्वाह होतो. त्यापैकी अशी अनेक कुटुंब आहेत ज्यांच्याकडे शिधापत्रिका नाही. त्यामुळे त्यांना शासनाच्या अंत्योदय अन्न योजनेचा लाभ मिळत नाही. त्यांना शिधापत्रिका मिळावी, गरजू कुटुंबांना अंत्योदय अन्न योजनेचा लाभ द्यावा, अशी मागणी उद्धवसेनेच्या वतीने करण्यात आली. संगमनेर उपविभागाचे उपविभागीय अधिकारी शैलेश हिंगे यांना मागणीचे निवेदन देण्यात आले. उद्धवसेनेचे माजी शहरप्रमुख अमर कतारी यांनी हे निवेदन दिले.

### श्रीगोंद्यात फसवणूक प्रकरणी तरुणास अटक

**श्रीगोंदा :** ऑनलाइन नेट बँकिंगच्या माध्यमातून आर्थिक फसवणूकप्रकरणी दिल्ली सायबर क्राइमच्या पथकाने शुक्रवारी दुपारी श्रीगोंदा शहरातून स्वप्निल जयकर याला अटक केली. दिल्ली पोलिसांचे एक पथक शुक्रवारी श्रीगोंदा शहरात दाखल झाले. त्यांनी स्वप्नील जयकर याला भारतीय संविधान संहिता कलम ३१८ (४) ३१९ (२) अंतर्गत ताब्यात घेतले. नंतर त्याला श्रीगोंदा येथील जिल्हा, सत्रन्यायालयात नेले. तेथे न्यायालयीन प्रकिया पूर्ण करून त्याला तपासासाठी दिल्लीला येथे नेण्यात आले आहे.

# बिनकामाचे मंत्री मंत्रिमंडळात अन् कामाचा बाहेर

## ओबीसी नेते प्रकाश शेंडगे यांची प्रतिक्रिया | छगन भुजबळ यांच्यासोबत बैठक



**नाशिक : प्रतिनिधी**

**राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांना मंत्रिपद मिळाले नसल्याने त्यांच्यासह ओबीसी नेते देखील नाराज असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे आज ओबीसी नेत्यांनी छगन भुजबळ यांची त्यांच्या शासकीय निवासस्थानी भेट घेत चर्चा केली. या चर्चेनंतर ओबीसी नेते प्रकाश अण्णा शेंडगे यांनी प्रतिक्रिया दिली आहे.**

**जे बिनकामाचे आहेत त्यांना आत घेतले**

माध्यमांशी बोलताना प्रकाश शेंडगे म्हणाले, या सरकारमध्ये ओबीसींची संख्या जास्त आहे त्यामुळे हे सरकार ओबीसींचे सरकार म्हणायला हरकत नाही, अशी भूमिका जि सरकार मांडत आहे. पण हे सगळे जरी खरे असले तरी हा सगळा गाव आमच्या मामाचा आहे, त्यातला एक तरी कामाचा पाहिजे न. जो कामाचा आहे त्याला बाहेर काढले आणि जे बिनकामाचे आहेत त्यांना आत घेतले, अशी टीका त्यांनी केली आहे.

३३ हजार ओबीसींच्या राजकीय जागा गायब केल्या

पुढे बोलताना प्रकाश शेंडगे म्हणाले, या १७ लोकांना आव्हान आहे त्यांनी आवाज उठवावा ओबीसींचा आणि जात जनगणनेचा प्रश्न सरकारकडे मांडून तो मंजुर करून घ्यावा. ३३ हजार याठिकाणी ओबीसींच्या राजकीय जागा गायब केल्या आहेत. त्यावर भाटीया कमिशनच्या माध्यमातून डल्ला मारण्यात आलेला आहे. या जागा परत आणण्यासाठी हे मंत्री काय करतात हेच आम्ही बघणार आहोत. आजच्या बैठकीत देखील आमचा निर्णय झालेला आहे की जोपर्यंत आमच्या ३३ हजार जागा पुन:स्थापित होत नाहीत, भाटीया कमिशनचा अहवाल रद्द होत नाही, कारण त्यांनी ओबीसींची ३७ टक्के संख्या सांगितली आहे. हा मोठा अन्याय आहे. त्यामुळे या सरकारने कुठल्याही परिस्थितीत स्थानिक निवडणुका घेऊ नयेत.

**आम्ही भुजबळांच्या पाठीशी ठामपणे उभे**

छगन भुजबळ यांच्या विषयी बोलताना प्रकाश शेंडगे म्हणाले, आम्ही भुजबळ साहेबांना म्हणालो आपण आमचे नेते आहात. आपला जो लढा आहे तो तुम्ही लढलात. जरांगे यांचे इतके मोठे वादळ या महाराष्ट्रात निर्माण झाले होते ते वादळ समर्थपणे हातळण्याचे काम हे आमच्या या नेतृत्वाने केले आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील तमाम भटके विमुक्त असतील, ओबीसी असतील सगळ्या संघटनेच्या नेत्यांनी एकमताने ठाम निर्णय घेतला आहे की भुजबळ मंत्रिमंडळात असोत किंवा नसोत आम्ही त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे असणार आहोत.

**ओबीसींचे आंदोलन सुरू करणार**

पुढे बोलताना प्रकाश शेंडगे म्हणाले, थोड्याच दिवसात आम्ही रस्त्यावरची लढाई देखील सुरू करणार आहोत. २४ तारखेला जरांगे यांचे आंदोलन सुरू होत आहे. त्याच्या समग त्याच्या तोडीसतोड ओबीसींचे आंदोलन देखील त्याठिकाणी सुरू होणार आहे. या सगळ्या लढ्याचे नेतृत्व भुजबळ साहेब केल्याशिवाय राहणार नाहीत. आमच्या आरक्षणाचे संरक्षण आम्हाला करावे लागणार आहे. हे जरी ओबीसीचे सरकार आले असले तरी देखील हे ओबीसीच्या आरक्षणाचे संरक्षण करू शकेल का यावर आम्हाला विश्वास नाही.

**शेर कभी बुढा नाही होता**

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले होते की नवीन लोकांना संधी देण्यासाठी काही आमदारांना मंत्रिपद दिले नाही. त्यामुळे जे नाराज आहेत त्यांनी समजून घेतले पाहिजे, या विधानावर बोलताना प्रकाश शेंडगे म्हणाले, हे बघा शेर कभी बुढा नाही होता. हा (छगन भुजबळ) ओबीसीचा शेर आहे, हा कधी म्हातारा होत नाही. त्यामुळे तरुणांने म्हातारे होण्याची व्याख्या जी आहे ती छगन भुजबळ यांना लागू होत नाही. त्यामुळे आमची विनंती आहे की अजितदादांनी पुन्हा एकदा विचार करावा.

# ४५ वर्षांपूर्वीची चुन्याची अक्षरे जागवताहेत बाबुराव दौंडकरांच्या आठवणी !

## ■ निवडणुक प्रचारासाठी रंगविली होती चुन्याने भिंत
## ■ मोटेवाडी तलावाजवळील जुनी इमारत लक्ष वेधतेय

**शिरुर : सतीश डोंगरे**





**सन १९७७ साली माजी आमदार बाबुराव दौंडकर यांनी शिरुर विधानसभेला जनता पार्टीकडून निवडणुक लढविली होती त्यावेळी प्रचारासाठी जुन्या इमारतीच्या एका भिंतीवर बाबुराव दौंडकर यांना विजयी करा अशी अक्षरे रंगविण्यात आली होती. मात्र ४५ वर्षांनी काहीशी पुसट झालेली ही अक्षरे आजही ही लक्ष वेधून घेत आहेत. त्यातून बाबुराव दौंडकरांच्या ४५ वर्षांपूर्वीच्या निवडणुकीच्या जुन्या आठवणींना उजाळा मिळत आहे.**

शिरुर- तांदळी रस्त्यावर मोटेवाडी तलावाजवळ एका छोट्याशा टुमदार टेकडीवर एक जुनी इमारत मोडकळीस आलेल्या अवस्थेत उभी आहे. याच इमारतीच्या पूर्वेला व उत्तरेला भिंतीवर बाबुराव दौंडकर यांना विजयी करा अशी अक्षरे रंगविण्यात आली होती. गेल्या ४५ वर्षांत ऊन, वारा,पाऊस यांचा तडाखा सोसून आजही चुन्याच्या सहाय्याने रंगविलेली ही अक्षरे शाबूत दिसतात. या रस्त्याने जाणाऱ्या येणाऱ्यांची ती अक्षरे लक्ष वेधून घेत आहेत.

१९७७ साली शिरूर विधानसभा मतदारसंघातून जनता पार्टीकडून दिवंगत आमदार बाबुराव दौंडकर हे निवडणुक लढवित होते तर त्यांच्या विरोधात काँग्रेसच्या तिकिटावर माजी आमदार सूर्यकांत पलांडे उभे होते. दौंडकर यांचे निवडणुक चिन्ह नांगरधारी शेतकरी होते तर पलांडे यांचे निवडणुक चिन्ह गाय वासरु होते. त्यावेळी बाबुराव दौंडकर हे लाल एसटीने खेड्यापाड्यात प्रचाराला जात अन् रात्री उशिरा कार्यकर्त्यांच्या घरी भाकरी चटणी खाऊन तेथेच मुक्काम करीत.

डोक्यावर केसरी पटका, साधं धोतर आणि अंगरखा, पायात साध्याच चपला आणि नेहमी हसतमुख चेहरा आणि विशेष म्हणजे शेतकरी कुटुंबातील माणूस म्हणून खेड्यापाड्यातील जनतेने दौंडकरांना त्यावेळी डोक्यावर घेतले होते. या निवडणुकीत दौंडकरांना जनतेने ९ हजार मतांची आघाडी देत विजयी केले. ऐकमेकांचा मानमरातब राखणारी आणि सुसंस्कृतपणाचे दर्शन घडविणारी ही निवडणूक होती.

याच निवडणुकीत बाबुराव दौंडकर यांच्या प्रचारासाठी गावोगावीच्या बस स्टॅण्डवर, मंदिराच्या आणि शाळांच्या भिंतीवर चुना, काऊ आणि निळीच्या मदतीने बाबुराव दौंडकर यांना विजयी करा अशी अक्षरे रंगविण्यात आली होती. काळाच्या ओघात ही सर्व अक्षरे नष्ट झाली मात्र शिरुर- तांदळी रस्त्यावर मोटेवाडी तलावाजवळील एका जुन्या इमारतीच्या भिंतीवरील ४५ वर्षानंतर ही अक्षरे स्पष्ट दिसत असल्याने नागरीकांमधून आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे.

## वाचकांच्या लेखणीतून

# माणसाच्या डोक्यातला किडा!



मी लहान न असताना माझ्या आजीच्या तोंडून काही चमत्कारिक गोष्टी ऐकल्या होत्या. जसा प्राण्यांच्या तसाच माणसाच्याही डोक्यात (मेंदूत) एक किडा असतो. तो सारखा वळवळ करीत असतो. म्हणूनच मनुष्य सतत काही ना काही विचार किंवा कृती करीत असतो.

सामान्य लोकांच्या बोलण्यातून सुध्दा रहमानी किडा, सुलेमानी किडा असे शब्द आपण ऐकत असतो. उपद्व्याप करणे यासाठी हे शब्द वापरले जातात.

मी विज्ञान शाखेचा नसून कला शाखेचा पदवीधर आहे. त्यामुळे मला याविषयी खोलात काही सांगता येणार नाही. पण माझ्या बालपणी मी पाहिलेला एक प्रसंग मला आठवतो.

एका बळी दिलेल्या मेंढ्यांच्या डोक्याचे दोन तुकडे केले गेले तेव्हा त्यांच्या मेंदूत सतत वळवळ करीत असलेला जनावरांच्या खतात सापडणारा एक मुन्नीसारखा चिकट आणि ओलसर, साधारण माणसाच्या करंगळीएवढा सफेद रंगाचा किडा मला दिसला! असाच किडा माणसाच्या ही मेंदूत असावा, असे वाटते. हाच माणसाच्याही मेंदूत वळवळ करणारा, त्याला काही ना काही विचार किंवा कृती करायला भाग पाडणारा रहिमानी किंवा सुलेमानी किडा असावा काय?

**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
**निघोज, ता. पारनेर,**
**जि. अहमदनगर.**

# ...तर मी अजितदादांबरोबर जाईन !

## शरद पवारांच्या आमदाराचे मोठे विधान

**सोलापूर : प्रतिनिधी**



**राज्यात गेल्या महिन्यात झालेल्या विधानसभा निवडणुकीनंतर महायुतीचे सरकार स्थापन झाले आहे. मंत्रिमंडळाचा विस्तार होऊन मंत्र्यांचे खातेवाटपही पूर्ण झाले आहे. अशात शरद पवार यांच्या राष्ट्रवादीचे माळशिरसचे आमदार उत्तम जानकर यांनी मोठे विधान केले आहे. अजित पवार यांच्याबाबतच्या काही गोष्टी तपासाव्या लागतील आणि त्यानंतर त्यांच्याबरोबर जाईन,असे जानकरांनी म्हटले आहे.**

माळशिरसचे आमदार उत्तम जानकर टीव्ही ९ मराठीशी बोलत होते. त्यावेळी त्यांना शरद पवार यांच्या राष्ट्रावादीचे आमदारअजित पवारयांच्या पक्षात जाणार असल्याच्या चर्चांबाबत विचारण्यात आले. यावर जानकर म्हणाले, ‘‘चर्चा या चर्चा राहतात. लोक अजित पवार यांना काही कामानिमित्त भेटायला जात असतील. उत्तम जानकरला सामावून घेण्याइतके अजित पवार यांचे नेतृत्व मोठे आहे का, हे मला पहिल्यांदा तपासावे लागेल. तेवढे मोठे नेतृत्व असेल तर मी अजित दादांबरोबर जाईन. त्यासाठी अजित दादांची कपॅसिटी पहिल्यांदा तपासावी लागेल.’’

माळसिरस विधानसभा मतदारसंघाचे राष्ट्रवादीचे (शरद पवार) आमदार उत्तम जानकर यांनीउद्धव ठाकरे,राहुल गांधी आणिअरविंद केजरीवालयांच्या मारकडवाडीच्या भेटीबाबात माहिती दिली आहे. आमदार उत्तम जानकर म्हणाले, ‘‘उद्धव ठाकरे पाच जानेवारीला मारकडवाडीला येणार आहेत. तर १० तारखेला किंवा एक दिवस मागे-पुढे राहुल गांधी आणि अरविंद केजरीवाल यांचे मारकडवाडीला येणाचे नियोजन सुरू आहे. यावेळी त्यांच्याबरोबर प्रियांका गांधीही येण्याचा प्रयत्न करणार आहेत. हे लोक इथे गावाने बंड का केले हे जाणून घेण्यासाठी आणि इथे काय झाले हे पाहण्यासाठी येणार आहेत.’’

उत्तम जानकर हे सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस विधानसभा मतदारसंघाचे राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) आमदार आहेत. २०१९ मध्ये निसटता पराभव स्वीकारलेल्या जानकर यांनी यावेळी भाजपाच्या राम सातपुते यांचा सुमारे १३ हजार मतांनी पराभव केला. यामध्ये विशेष असे की, गेल्या वेळी भाजपाच्या राम सातपुते यांना अकलूजच्या मोहिते पाटलांची साथ असल्याने ते विजयी झाले होते.

# लोककला टिकवण्यासाठी समाजात जागर व्हावा

## शाहीर हरिदास शिंदे यांचे प्रतिपादन | न्यू आर्टस् कनिष्ठ महाविद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ



**नगर : प्रतिनिधी**

**लोककलेचे शरीर जरी मनोरंजन असेल तरी आत्मा प्रबोधनाचा असावा लोकसंगीत हे सर्वसामान्य जीवनाशी निगडित आहे. मोबाइल व टीव्हीच्या युगात लोक कला जपण्यासाठी समाजात जागर झाला पाहिजे व कलाकारांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध झाले पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराज घडवण्याची ताकद स्त्रियांमध्ये आहे. स्त्रियांमध्ये लोककलेची आवड असणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन शाहीर हरिदास शिंदे यांनी केले**

न्यू आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज च्या कनिष्ठ महाविद्यालयाचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात पार पडला.

अध्यक्षस्थानी जयंत वाघ हे होते. याप्रसंगी अ‍ॅड. दीपलक्ष्मी म्हसे, जी. डी. खानदेशी, दीपक दरे, निमा काटे, कॅप्टन चौधरी उपस्थित होते. शाहीर शिंदे म्हणाले, पैसा हे जीवनाचे साधन आहे जीवनाचे साध्य नाही. वासुदेव म्हणजे धर्मरक्षक, वासुदेव म्हणजे पॉझिटिव्ह एनर्जी आहे.या कार्यक्रमातून महाराष्ट्रातून लुप्त होत चाललेल्या शिवकालीन लोककलांना जपण्याचे काम व त्यास न्याय देण्याचा प्रयत्न करत आहोत.

जयंत वाघ म्हणाले, मनुष्य शरीराने सुदृढ झाल्यास तो चांगले विचार करतो .त्याच्या हातून चांगले कार्य घडते. खेळाडू वृत्तीने हार न मानता सातत्याने प्रयत्न करणे व अपयश पचवण्याची शक्ती निर्माण होते. विद्यार्थ्यांना अभ्यासाबरोबरच कलागुणांना वाव देण्यासाठी संस्थेचे वतीने विविध उपक्रम राबविण्यात येतात. कौशल्य वर आधारित शिक्षण दिल्याने विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासू वृत्ती निर्माण होते.

वारसा महाराष्ट्राचा या कार्यक्रमात शाहीर हरिदास शिंदे यांनी रसिक होऊ दे रंग चढु दे नटरंग लेहरा तालबाजी ),गणराया ताराया (गण), सुंदर माझे जाते गं (ओवी उखाणा), तू ऐक ना गं बाई पिंगळा महाद्वारी (पिंगळा), गाव जागा झाला सारा, उजळून आल आभाळ,वासुदेव आला हो, प्रबोधन (बतावणी), आली हसत खेळत (पोतराज), लावणी, चमके शिवबाची तलवार,पालखी (छबीना), जागरण गोंधळ आदी कार्यक्रम सादर करून विद्यार्थ्यांमध्ये लोककलांचा जागर केला.

उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते शैक्षणिक, कला, क्रीडा, सांस्कृतिक क्षेत्रातील गुणवंत विद्यार्थ्यांचा पारितोषिक देऊन गुणगौरव करण्यात आला. सूत्रसंचालन प्रा.राजेंद्र जाधव यांनी, स्वागत गीत संगीत विभागाने केले. प्रास्ताविक उपप्राचार्य प्रा .कल्पना दारकुंडे, स्वागत प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे, अतिथी परिचय डॉ प्रा.दत्तात्रय नकुलवड , अहवाल वाचन मंदाकिनी कराळे यांनी, तर आभार पर्यवेक्षक प्रा. सुभाष गोरे यांनी मानले.

(पान १ वरून)

### पुण्यात डंपरने नऊ जणांना चिरडलं; दोन बालकांसह तिघांचा जागीच मृत्यू

ताब्यात घेतले आहे. अपघातामधील मृत कामगार हे अमरावतीमधील आहेत. विशाल विनोद पवार (वय २२), वैभवी रितेश पवार (वय १), वैभव रितेश पवार (वय २) अशी मृतांची नावे आहेत. या अपघातात सहा जण गंभीर जखमी असून त्यांच्यावर ससून रूग्णालयात उपचार सुरू आहेत. सहापैकी तीन जणांची प्रकृती गंभीर असल्यचीही माहिती मिळत आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली होती. जखमींना जवळच्या रूग्णालयात दाखल करण्यात आले होते, त्यानंतर त्यांना ससून रूग्णालयात दाखल करण्यात आले.

### राज्यातून गुलाबी थंडी गायब

कोरड्या वाऱ्यांचा झोत महाराष्ट्राकडे असल्याने राज्यात गारठा जाणवत असून पहाटे दाट धुकं आणि कडाक्याची थंडी आहे. तर दुसरीकडे बंगालच्या उपसागरात चक्राकार वाऱ्याची तीव्रता वाढल्याने येत्या दोन दिवसात पावसाला पोषक स्थिती निर्माण झाली आहे. पूर्व व पश्चिम विदर्भात हलक्या ते मध्यम सरींच्या पावसाचा अंदाज प्रादेशिक हवामान केंद्राने दिला आहे. मध्य महाराष्ट्र, कोकण, मराठवाड्यात येत्या चार ते पाच दिवसात किमान तापमान चढेच असेल. येत्या २४ तासांत किमान तापमानात हळूहळू २-४ अंशांनी वाढ होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. पुढील पाच दिवस बहुतांश राज्यात थंडीचा जोर कमी होणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

### नववर्षाच्या स्वागतासाठी साईमंदिर रात्रभर खुले राहणार

फटाके व वाद्य वाजवण्यास मनाई करण्यात आली. सुरक्षिततेच्या दृष्टीने शिस्तीचे पालन करण्याचे आवाहनही कोळेकर यांनी केले. हा महोत्सव यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी संस्थानचे प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब कोळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थानचे प्र. उपमुख्य कार्यकारी अधिकारी व सर्व प्रशासकीय अधिकारी तसेच सर्व विभागांचे विभाग प्रमुख व सर्व कर्मचारी प्रयत्नशिल आहे, असे त्यांनी सांगितले.

# हजारे, पवार यांचा आदर्श डोळयापुढे ठेऊन वाटचाल करा

## प्रसन्न व तनुजा यांना मुख्यमंत्र्यांचे आवाहन

**नगर : प्रतिनिधी**

**प्रसन्न व तनुजा यांनी ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे तसेच आदर्श गाव योजनेचे कार्याध्यक्ष पोपटराव पवार यांचा आदर्श डोळयापुढे ठेऊन भविष्यात वाटचाल करण्याचे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.**



■ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे, विधानपरीषदेचे सभापती राम शिंदे व विविधि मंत्री, आमदार, अधिका-यांच्या उपस्थितीमध्ये प्रसन्न व तनुजा यांचा विवाह पार पडला.

नगर येथे पद्मश्री पोपटराव पवार यांचे सुपूत्र प्रसन्न व अशोक भगत यांची कन्या तनुजा यांच्या विवाहासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांनी हजेरी लावली होती. त्यावेळी त्यांनी वुध वरांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी अण्णा हजारे, विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, मंत्री गिरीश महाजन, राधाकृष्ण विखे, आ. संग्राम जगताप, आ. काशिनाथ दाते, मा. आ. अरूण जगताप, आ. शिवाजी कर्डिले, मा. आ. बबनराव पाचपुते, मा. आ. भिमराव धोंडे, मा. आ. शंकरराव गडाख, विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम, मुख्यमंत्र्यांचे सचिव श्रीधर परदेशी, विशेष पोलीस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे, जिल्हाधिकारी सिध्दाराम सालीमठ, पोलीस अधिक्षक राकेश ओला, निरंजन महाराज, कॅप्टन अशोककुमार खरात आदी यावेळी उपस्थित होते.

### फडणवीस यांना मानपत्र

**श्रीकृष्णाने अर्जुनाला कुरूक्षेत्रावर दिलेला उपदेश असलेले मानपत्र यावेळी फडविस यांना हिवरे बाजार ग्रामस्थांच्या वतीने देण्यात आले. ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे स ग्रामस्थांच्या वतीने ते मुख्यमंत्री फडणवीस सन्मानपुर्वक प्रदान करण्यात आले.**

फडणवीस म्हणाले, अण्णा हजारे यांच्यासारखे एक प्रेरणा पुरूष आणि पद्मश्री पोपटराव पवार यांच्यासारखे समाजपुरूष या ठिकणी एकत्रीत आहेत. त्यांच्या कार्याची प्रेरणा वधू वरांनी घ्यावी. ईश्वराने त्यांच्या सर्व मनोकामना पुर्ण कराव्यात, त्यांना सुख, समाधान, आरोग्य, ऐश्वर्य द्यावं. त्यांच्या हातून उत्तम काम घडावं. ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनीही यावेळी शुभेच्छा दिल्या.

# निवडणूकीत ओबीसी भाऊ, गरज संपली फेकून देऊ !

**निघोज : प्रतिनिधी**

**ओबीसींचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांना मंत्रीपद न देणे म्हणजे निवडणूकीवेळी ओबीसी समाज भाऊ, मात्र निवडणूक संपली की ओबीसींना फेकून देऊ अशी स्थिती निर्माण झाल्याची जळजळीत टीका समता परिषदेचे पदाधिकारी खंडू भुकन यांनी केली.**



छगन भुजबळ यांचा आदेश शिरोधार्ह मानून विधानसभेला ओबीसी बांधवांनी मोठया प्रमाणावर महायुतीला मतदान केले. भुजबळ हे अतिशय क्रियाशिल मंत्री आहेत. १९८५ सालापासून त्यांनी विविध पदांवर काम करताना त्या पदांची प्रतिष्ठा वाढविली.

ओबीसींच्या आरक्षणाच्या प्रश्नावर मंत्रीपदाचा राजीनामा देण्याची त्यांनी तयारी दर्शविली. शिवाजी महाराज, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महापुरूषांचा आदर्श डोळयापुढे ठेऊन ओबीसी समाजासाठी ते लढत आहेत. भुजबळ जर मंत्रीमंडळात नसतील तर शासन दरबारी या वर्गाचे प्रतिनिधीत्व मांडले जाणार नाही. हा समाज पोरका होईल. त्यासाठी भुजबळ हे मंत्रीमंडळात असावेत या आमच्या भावना आहेत. ओबीसी समाजाचे इतर नेते आहेत मात्र त्यांनी कधीही उघड भूमिका न घेता केवळ स्वतःची खुच सांभाळण्याचे काम ते करतात असे भुकन यांनी सांगितले.

### भुजबळ बांधतील तेच तोरण !

**महाराष्ट्रातील ओबीसी समाज यापुढे भुजबळ सांगतील ते धोरण आणि बांधतील तेच तोरण ही भूमिका घेणार आहे. लवकरच ओबीसी समजाचे नगर जिल्यातील शिष्टमंडळ देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना भेटणार असून ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांचा मंत्रीमंडळात समावेश करून ओबीसी समाजावरील अन्याय दूर करावा अशी मागणी करण्यात येणार आहे.**

**खंडू भुकन**
**समता परिषदेचे पदाधिकारी**

# गरजू विद्यार्थ्यांना मदतीचा हात देत वाढदिवस साजरा!

## उद्योजक संदिप रोहोकले यांनी जपली सामाजिक बांधिलकी



**भाळवणी : प्रतिनिधी**

**येथील उद्योजक संदिप रोहोकले यांनी वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत महात्मा फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील गरजू विद्यार्थ्यांना मदतीचा हात देत वाढदिवस साजरा केला.**

वाढदिवसाचे औचित्य साधत श्री.रोहोकले यांच्या वतीने सेवानिवृत्त शिक्षक ज्ञानदेव लंके गुरुजी यांच्या हस्ते विद्यालयातील ५० गरजू विद्यार्थ्यांना नामांकित कंपनीचे स्कूल शुज व खाऊ वाटप करण्यात आले.

या वेळी बोलताना श्री.लंके गुरुजी म्हणाले की,कर्मवीर भाऊराव पाटील व लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांनी समाजासाठी जो त्यागाचा आदर्श ठेवला, त्याप्रमाणे आजही समाजातील गरजवंत विद्यार्थ्यांसाठी संदिप रोहोकले यांच्यासारख्या दातृत्व असणारे व्यक्ती समाजात आहे याचे समाधान वाटते असेही ते म्हणाले.

यावेळी प्राचार्य बी.एस. नाईकवाडी,पर्यवेक्षक सदानंद सोनावळे,प्रा. सुधीर लाकूडझोडे,स्कूल कमिटीचे सदस्य बबलूशेठ रोहोकले, बंडूशेठ रोहोकले, खरेदी-विक्री संघाचे व्हा.चेअरमन गंगाधर रोहोकले, संदीप भागवत,बच्चू रोहकले, रेवणनाथ रोहोकले, राजेंद्र जाधव, संदीप संभाजी रोहोकले, कौसर पठाण,अशोक झरेकर,सर्व शिक्षक विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी श्री. रोहोकले यांनी विद्यार्थ्यांसाठी मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार असल्याचे सांगत स्पर्धे साठी आकर्षक बक्षीसे जाहीर केले.स्पर्धेमध्ये जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा असा आवाहन केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष रोहोकले यांनी केले. यावेळी सर्व शिक्षक विद्यार्थी उपस्थित होते.

# जिल्हा बँकेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना न्याय देण्याचे काम

## आ.शिवाजीराव कर्डिले यांचे प्रतिपादन

**पारनेर : प्रतिनिधी**

**जिल्हा सहकारी बँकेच्या माध्यमातून जिल्ह्यातील शेतकऱ्यांना गेली दोन वर्षात मोठ्या प्रमाणात न्याय देण्याचे काम केले याची परिणीती म्हणून आपण विधानसभेत विजयी झाल्याची प्रतिक्रिया आमदार शिवाजीराव कर्डिले यांनी व्यक्त केली.**

जिल्हा सहकारी बँकेच्या पारनेर तालुक्यातील अधिकारी व कर्मचारी यांच्या वतीने त्यांचा जिल्हा सहकारी बँकेचे तालुका विकास अधिकारी प्रभाकर लाळगे, मुख्य कार्यालयाचे इंद्रभान शेळके , संजय शेळके यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला यावेळी ते बोलत होते.



आमदार कर्डिले यावेळी बोलताना म्हणाले की,संचालक मंडळ, अधिकारी व कर्मचारी तसेच सोसायटीचे पदाधिकारी व संचालक तसेच सचिव यांचे जिल्हा सहकारी बँकेच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात योगदान असून शेतकऱ्यांना गेली दोन वर्षात चांगल्या सुविधा देण्याचा प्रयत्न आपण केला त्याची परिणीती चांगली झाली व आपल्याला आमदार होण्याची संधी सर्वसामान्य जनतेने दिली असून यापुढे सुद्धा अशाप्रकारे काम करण्याची आपली पद्धत असणार असून यासाठी अधिकारी व कर्मचारी हे चांगली सेवा देण्याचा प्रयत्न करतील अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.


यावेळी गोकुळ लोंढे, राजू पठारे, चंद्रकांत वराळ, शहाजी मोरे, वसंत कदम, जालिंदर झावरे, स्वप्नील गायकवाड, संभाजी औटी , संस्था सचिव मंगेश देशमुख, शिवाजी दरेकर, नवनाथ पाचर्णे, अजित वाघमारे आदी तसेच अधिकारी व कर्मचारी तसेच सोसायटीचे सचिव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भाऊसाहेब आहेर यांना साने गुरुजी आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर

## शिक्षण व सहकार क्षेत्रातील कार्याची दखल

**निघोज : प्रतिनिधी**

**महापालिका माध्यमिक शिक्षक संघ मुंबई आणि सहकार मित्र सुरेश डावरे सहकारी पतसंस्थेच्या वतीन दिला जाणारा यंदाचा साने गुरुजी आदर्श शिक्षक पुरस्कार सेकंडरी स्कुल्स एम्प्लॉईस क्रेडिट सोसायटीचे संचालक व माध्यमिक शिक्षक संघाचे उपाध्यक्ष भाऊसाहेब आहेर यांना जाहीर झाला आहे.**



या वर्षाच्या अखेरीस २५ डिसेंबरला विविध मान्यवरांच्या हस्ते व उपस्थितीत घाटकोपर येथील पाटीदार हॉल सभागृहात प्रदान केला जाणार आहे श्री . आहेर हे गेली ३० वर्षे शैक्षणिक व सहकार क्षेत्रात काम करीत असून त्यांच्या कामाची दखल घेत वरील संस्थेने पुरस्कार जाहीर केला आहे. पुरस्कार जाहीर झाल्यानंतर अनेक मित्र परिवाराने श्री.आहेर यांचे अभिनंदन केले आहे.

# सचिन ठाणगे मोडी लिपी परीक्षेत द्वितीय

## नगर येथे मोडी लिपी प्रशिक्षण कार्यशाळा

**तिखोल : प्रतिनिधी**

**पुराभिलेख संचालनालय, महाराष्ट्र शासन , मुंबई यांच्या वतीने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय मोडी लिपी परीक्षेत तिखोल (ता. पारनेर ) येथील सचिन ठाणगे यांनी द्वितीय क्रमांक मिळविला आहे.**



राज्यस्तरीय मोडी लिपी प्रशिक्षण कार्यशाळा नगर येथे घेण्यात आली होती. यामध्ये विभागातून ७२ मोडीलिपी अभ्यासक सहभागी झाले होते. त्यात ठाणगे यांनी प्रथम श्रेणी घेत द्वितीय क्रमांक पटकविला . ठाणगे सध्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा धोत्रे खुर्द ता .पारनेर येथे शिक्षक म्हणून कार्यरत आहेत.

कार्यशाळा प्रशिक्षक म्हणून विनायक पाटील (कोल्हापूर ),लक्ष्मण भिसे (पुणे ) यांनी काम पाहिले.तर स्पर्धेच्या आयोजनात न्यू आर्टस ,कॉमर्स अॅन्ड सायन्स महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. बी. सागडे , इतिहास विभाग प्रमुख प्रा.डॉ.सागर सप्रे , भरत होळकर, मिना साळे ,वृषाली चत्तर यांनी परिश्रम घेतले.

# भाळवणीत ३१ डिसेंबरला मोफत महाआरोग्य शिबिर

## कै.गंगाराम भनगडे यांच्या पुण्यस्मरणाचे औचित्य । संतोष भनगडे यांची माहिती



**भाळवणी : प्रतिनिधी**

**सैनिक सहकारी बँकेचे संस्थापक संचालक कै.गंगाराम धोंडीबा भनगडे यांच्या प्रथम पुण्यस्मरणार्थ मंगळवार दि.३१ डिसेंबर रोजी भाळवणी येथे मोफत महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आल्याची माहिती भाळवणी ग्रामीण पतसंस्थेचे अध्यक्ष संतोष भनगडे यांनी दिली.**

कै.भनगडे हे सैन्य दलात कार्यरत असताना युद्धभूमीवर देशाची सेवा करताना ते जखमी झाले होते.सेवानिवृत्तीच्या काळानंतर ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थापन झालेल्या सैनिक सहकारी बँकेच्या उभारणीतही त्यांचे मोठे योगदान होते.माजी सैनिकांच्या कल्याणासाठी त्यांचा मोलाचा वाटा होता. त्यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त भाळवणी येथे मोफत महाआरोग्य शिबिर व विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

### इंदुरीकर महाराजांची कीर्तन सेवा

**कै. भनगडे यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त मंगळवार दि.३१ डिसेंबर रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत समाजप्रबोधनकार निवृत्ती महाराज इंदुरीकर यांच्या कीर्तनाचे तसेच त्यानंतर महाप्रसादाचेही आयोजन करण्यात आले आहे. नगर - कल्याण महामार्गावरील हॉटेल स्वादच्या प्रांगणात होणाऱ्या या सर्व कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.**

नामांकित आंतरराष्ट्रीय दर्जाचे अद्यावत हॉस्पिटलच्या तज्ञ डॉक्टरांमार्फत मंगळवार दि.३१ रोजी सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत मोफत सर्व रोग तपासणी शिबिर आयोजन करण्यात आले आहे.यामध्ये नगर येथील इंडो आयरिश हॉस्पिटल यांच्या विद्यमाने हृदयरोग,मधुमेह, पाठदुखी, गुडघेदुखी, उच्च रक्तदाब , स्त्रीरोग, बालरोग, किडनी विकार, डायलिसिस ,जनरल सर्जरी, कान नाक घसा तपासणी करण्यात येणार आहे. या शिबिरात मोफत औषधे, साखर तपासणी, व ईसीजी सुविधाही उपलब्ध आहे.महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना ,आयुष्यमान भारत व मुख्यमंत्री सहाय्यता निधी अंतर्गत मोफत अॅन्जीओप्लास्टी , डायलेसीस /किडनी विकार, कर्करोग शस्त्रक्रिया , नवजात अतिदक्षता विभाग,अपघात व पॉली ट्रामा फ्रॅक्चर याचा लाभही या शिबिरात रुग्णांना मिळणार आहे.

नारायणगाव येथील मोहन ढुसे नेत्र रुग्णालय यांच्या वतीने नेत्र तपासणी व मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले असून महाआरोग्य शिबिर व मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहनही भनगडे परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

### शिबिरासाठी संपर्क

**या शिबिरासाठी व अधिक माहितीसाठी अरिहंत हॉस्पिटल भाळवणी डॉ.शैलेश लोढा मोबा.९४२३४४८६६४ यांच्याकडे नाव नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.**

# खा. लंकेंच्या माध्यमातून गावाचा सर्वांगिण विकास

## भाऊसाहेब भोगाडे यांचे प्रतिपादन । विविध विकास कामांचा शुभारंभ

**सुपा : प्रतिनिधी**

**लोकनेते खासदार नीलेश लंके यांच्या माध्यमातून गावातील वाडया वस्त्या कॉंक्रीटच्या रस्त्याने जोडल्या गेल्याने गावातील सर्वसामान्य जनतेच्या जिव्हाळयाचा प्रश्न मार्गी लागला असून गावाचा सर्वांगिण विकास झाल्याचे नीलेश लंके प्रतिष्ठाणचे तालुका सचिव,माजी सरपंच भाऊसाहेब भोगाडे यांनी सांगितले.**

भोयरे गांगर्डा येथील विविध विकास कामांचा शुभारंभ रविवारी पार पडला. त्यावेळी भोगाडे यांनी खा. नीलेश लंके यांच्या माध्यमातून गावात विविध विकास कामे मार्गी लागल्याचे सांगितले. यापुढील काळातही खा. लंके हे विकास कामे माग लावण्यासाठी कटीबध्द असतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी सरपंच पुजा केकडे, उपसरपंच आदिनाथ गायकवाड, मा. सरपंच तथा सैनिक बँकेच्या संचालक अनिता भोगाडे, मा. सरपंच भाऊसाहेब चांगदेव भोगाडे, चेअरमन अर्जुन रसाळ, दादासाहेब रसाळ, अशोकराव पवार, माणिक पवार, दौलतराव गांगड, रविंद्र भोगाडे, विठ्ठलराव भोगाडे, महादेव भोगाडे, सुभाष भोगाडे, रामभाऊ भोगाडे, बाळासाहेब गायकवाड, प्रविण गायकवाड, पांडूरंग भोगाडे, तुकाराम भोगाडे, दिलीपराव भोगाडे, अशोक रसाळ, प्रमोद रसाळ, सचिन रसाळ, संतोष केकडे, भास्कर रसाळ, राजेंद्र रसाळ, संजय पवार, गोपीचंद भोगाडे, आदी उपस्थित होते.



### या कामांचे झाले भुमिपूजन

**माळवाडी रस्ता कॉंक्रीटीकरण २० लाख, विठ्ठलवाडी परिसर दरेकर वस्ती रस्ता कॉंक्रींटीकरण ३५ लाख, गावांतर्गत कामठे वस्ती रस्ता कॉंक्रीटीकरण १० लाख, वाघजाई विठ्ठलवाडी रस्ता खडीकरण, मुरमीकरण १८ लाख.**

### गावाच्या विकासासाठी प्रयत्नशील

**गेल्या दहा वर्षात खा. लंके यांच्या मार्गदर्शनाखाली गावातील वाडया-वस्त्या सिमेंट कॉंक्रीटच्या रस्त्याने जोडल्या गेल्या. त्यामुळे दळणवळणाचा प्रश्न मार्गी लागला. भैरवनाथ मंदिरासमोर भव्य सभामंडप उभा राहिल्याने गोर गरीब, गरजूंच्या मुला-मुलींचे विवाह तिथे पार पडू लागले. गावाला भव्य कमान उभी करता आली. लवकरच ग्रामपंचायत कार्यालय व बचत गट भवनाची उभारणी होणार आहे.**

**भाऊसाहेब भोगाडे, मा. सरपंच**

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com